पूरक पोषण आहार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या खिचडीकरीता लागणारी तूरडाळ महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेकडून पुरवठा तसेच कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१७ /प्र.क्र.१३६ /का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ मे, २०१८

वाचा :- (१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक सपस २०१७/प्रक्र १९८/२४स, दिनांक २३ ऑक्टोबर,२०१७, दिनांक १६.४.२०१८ व दिनांक २०.४.२०१८

प्रस्तावना :-

महिला व बाल विकास विभागाअंतर्गत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांचेमार्फत राज्यातील कुपोषित बालकांकरीता केंद्र पुरस्कृत पुरक पोषण आहार योजना राज्यातील ग्रामीण, आदिवासी व नागरी भागात राबविण्यात येते. या योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाडीस्तरावर कुपोषित बालकांना विविध प्रकारचा सकस व पुरक पोषण आहार देण्यात येतो. त्यानुसार तांदुळ व तुरडाळ यांचे मिश्रण असणा-या खिचडीचा आहारामध्ये समावेश असतो. सद्य यामध्ये प्रत्येक लाभार्थ्याला २० ग्रॅम तुरडाळीचा समावेश असणारी खिचडी ही प्रत्येक महिन्यात ८ दिवस याप्रमाणे लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येते.

केंद्र पुरस्कृत पुरक पोषण आहार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या खिचडी या आहाराकरीता राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी केंद्रावर आवश्यक असणा-या तुरडाळ ही राज्य शासनाने आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यातील शेतक-यांकडून खरेदी केलेल्या तूरीपासून महाराष्ट्र राज्य सहाकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेमार्फत भरडाई करुन विक्रीकरीता उपलब्ध करुन दिलेल्या तुरडाळीमधून खरेदीकरण्यास मान्यता देण्याची तसेच विनियोगाची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

केंद्र पुरस्कृत पूरक पोषण आहार योजनेंतर्गत राज्यातील लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या खिचडीकरीता तुरडाळीची खरेदी ही राज्य शासनाने आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यातील शेतक-यांकडून खरेदी केलेल्या तूरीपासून महाराष्ट्र राज्य सहाकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेमार्फत भरडाई करुन विक्रीकरीता उपलब्ध करुन दिलेल्या तुरडाळीमधून प्रती किलोग्रॅम रु.५५/- याप्रमाणे खरेदीकरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेकरीता तूरडाळ वापराची कार्यवाही खालील प्रमाणे करण्यात येईल :-

१. पूरक पोषण आहाराकरीता तूरडाळीचा अंतर्भुत असणारी खिचडी ही आठवडयातून ३ दिवस याप्रमाणे महिन्यातून १३ दिवस देण्यात यावी. यात प्रत्येक लाभार्थ्याला एका दिवसासाठी ३० ग्रॅम तुरडाळीचा समावेश असेल.

२. महिला व बाल विकास अधिकारी (जि.प.) व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांनी त्यांच्या अंतर्गत असणा-या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार आवश्यक असणा-या तूरडाळीची मागणी ही महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., कन्मूर हाऊस, मसजिद, मुंबई यांचेकडे अथवा महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., कन्मूर हाऊस, मसजिद, मुंबई यांच्या जिल्हा विपणन अधिकारी यांचेकडे नोंदवावी. या कार्यपध्दतीचे सूक्ष्मनियोजन संबंधित महिला व बाल विकास अधिकारी (जिप) व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांनी करावे.

३. पूरक पोषण आहाराकरीता आवश्यक असणा-या तूरडाळीचा पुरवठा हा प्रकल्पनिहाय महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेमार्फत करण्यात येणार असल्याने याकरीता वेगळयाने वाहतूक खर्चाकरिता महिला व बाल विकास विभागाकडून कुठलीही आर्थिक तरतूद करण्यात येणार नाही. तसेच मागणीनुसार नियोजित वेळेत तूरडाळीच्या पुरवठयाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांची राहील. त्याचप्रमाणे तुरडाळीचा विनियोग लाभार्थीकडून झाल्याबाबत प्रमाणीत करण्याची व पणन महासंघाला पोहोच पावती देण्याची जबाबदारी ही संबंधीत महिला व बाल विकास अधिकारी (जि.प.) व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांची राहील.

४. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या तुरडाळीचे देयक हे संबंधीत महिला बचत गट/महिला मंडळ यांच्या देयकातून परस्पर वजा/कपात करुन महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या जिल्हा कार्यालयाला अदा करण्यात यावे.

५. महिला व बाल विकास अधिकारी (जि.प.) व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांनी त्यांच्या अंतर्गत असणा-या लाभार्थ्यांकरीता प्रथम दोन महिन्याच्या पूरक पोषण आहाराकरीता आवश्यक असणा-या तूरडाळीची मागणी संबंधीत जिल्हातील पणन महासंघाच्या कार्यालयाकडे नोंदवावी.

६. या अंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या तूरडाळीच्या विनियोगाबाबतची प्रमाणित आकडेवारी व उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना पाठविण्याची जबाबदारी ही महिला व बाल विकास अधिकारी (जि.प.) व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांची राहील.

७. सदर आदेश हे किमान ६ महिने कालावधीपर्यंत अमलात राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०७१७०३२७२७३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.05.07 17:07:33 +05'30'

(ला.रा.गुजर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
६) अतिरिक्त मुख्य सचिव (पणन), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
८) सह सचिव (श्री गुजर)/उप सचिव (श्रीम.निवतकर), महिलाव व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) व्यवस्थापकीय संचालक, दि महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., कन्मूर हाऊस, मसजीद बंदर, मुंबई.
१०) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
११) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) सर्व जिल्हाधिकारी.
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१५) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी(जिल्हा परिषद).
१६) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी).
१७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) निवड नस्ती (कार्यासन-५), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.